अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# NOTICE

नोटीस क्र. – 293 दि. १८/०९/२०२४

19 SEP 2024

## वरिष्ठ महाविद्यालयातील बी.बी.ए, बी.बी.ए (सी.ए), एम.एस्सी (संगणकशास्त्र) या शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या एन.टी./ओ.बी.सी/एस.बी.सी. या जात संवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना

महाराष्ट्र शासन इतर बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृत्ती – २०२३ /प्र.क्र.१०१/शिक्षण -१ या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून वरिष्ठ महाविद्यालयातील एन.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. या कॅटेगरीतील बी.बी.ए. (प्रथम ते तृतीय वर्ष) व बीबीए (सीए) (प्रथम ते तृतीय वर्ष) तसेच एम.एस्सी.(संगणकशास्त्र) भाग १ व भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. याची वरील वर्गाच्या संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## Website- www.mahadbt.maharashtra.gov.in

## ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे

१) विद्यार्थ्यांचा स्वतःच्या नावाचा जातीचा दाखला.

२) सन २०२३-२४ मधील मा.तहसिलदारांचा विद्यार्थ्यांच्या वडीलांचे नावे उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे. स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.१,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार एवढी आहे) तसेच फ्रिशिपसाठी रु.८,००००० /- (आठ लाख रुपये एवढी उत्पन्न मर्यादा आहे.

३) वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडीलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४) आधार कार्ड झेरॉक्स.

५) आधारकार्ड बॅकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.

६) मागील वर्षाचे मार्कशिट झेरॉक्स व इयत्ता १० वीचे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

७) गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हिट आवश्यक.

८) डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स.

९) शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. झेरॉक्स जोडावी.

१०) स्वतःचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले बॅकपासबुक(आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)

११) रेशनकार्ड झेरॉक्स (पहिले पान व कुटूंबाचे नाव असलेले पान)
१२) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे प्रवेश फी चलन झेरॉक्स
१३) महाडिबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.
१४) बी.बी.ए.(सी.ए) च्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीवर फॉर्म भरताना बी.सी.ए.(कॉमर्स) हा कोर्स सिलेक्ट करावा.

## विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म कसा भरावा याबाबत महत्वाची सूचना

१५) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलमध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
१६) स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅन्ट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.
१७) विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्यांने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होत व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांन शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.
१८) विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/ सिलेक्ट करावे.

## Senior College- Tuljaram Chaturchand College (0)

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप व फ्रिशिपचे फॉर्म भरलेले आहेत. परंतु शासनाकडून अद्यापही विद्यार्थ्यांना व महाविद्यालयाला शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झालेली नाही. अशातच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वरील सर्व कोर्ससाठी महाविद्यालयाने फी कन्सेशन दिलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाकडून जर दिलेल्या सवलतीची रक्कम महाविद्यालयाला मंजुर झाली नाही तर विद्यार्थ्यांना उर्वरित सर्व दिलेल्या कन्सेशनची रक्कम भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन /फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा-या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2024-2025\NOTICE 2024-25.docx